# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

**बी.एड.द्वितीय वर्ष २०२३-२४**
**तृतीय आंतरवासिता गट क्र.१**
**सी.के.ठाकूर विद्यालय नवीन पनवेल**

# सुरुंग फोडते



## जागतिक महिला दिनानिमित्त विशेषांक

प्रेरणास्थान
प्राचार्य,डॉ.रमा भोसले

## संपादक मंडळ

संपादक
प्रा. बिजली दडपे

कार्यकारी संपादक
प्रतिक स्मिता उत्तम पवार

सहसंपादक
प्रज्ञा साळुंखे

सदस्य
भावना भगत,विपुल धापशी,ज्योती डोंबरे, प्रेमा पडवळे,सुरज बुंधे,सुरज म्हस्कर, सुस्मीता रणपिसे

# संपादकीय

21व्या शतकात जगत असताना समता, समानता व न्याय सर्व तत्त्वांची अंमलबजावणी करीत मानवी आयुष्याचा प्रवास खरंतर सुरू व्हायला हवा होता. परंतु आजही या समाजातील काही विशिष्ट घटक आजही या संकल्पनेच्या परिप्रेक्षा बाहेरच आहेत. आणि त्यामध्ये स्त्री हा सर्वात महत्त्वाचा घटक ठरतो. पण कालांतराने शिक्षण आणि संविधान या दोहोंच्या बळावरती विघातक संस्कृती आणि रुढींच्या जाचात अडकलेल्या स्त्रीने आज अन्यायाचे आणि स्त्री दास्याचे सूरुंग फोडले आहेत. आणि हे दास्याचे सुरुंग फोडणाऱ्या काही कर्तृत्ववान महिलांचा परिचय या विशेषांकातून करून देण्याचा हा अल्पसा प्रयत्न!!

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल मधील 2023-24 या शैक्षणिक वर्षातील बी.एड्. द्वितीय वर्ष, तृतीय सत्रातील आंतरवासिता गट क्रमांक 1 , अर्थात चांगू काना ठाकूर विद्यालय , पनवेल येथील छात्राध्यापकांनी जागतिक महिला दिनानिमित्त 'सुरूंग फोडिते' या विशेषांकाचे सृजन छात्रमुख्याध्यापक प्रतिक स्मिता उत्तम पवार यांच्या नेतृत्वाखाली केले आहे.

सामाजिक, शैक्षणिक, साहित्य आणि क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटवीत देशाचे नाव उज्वल करत समाजासाठी आदर्श निर्माण करणाऱ्या काही निवडक कर्तुत्वान स्त्रियांच्या कार्याचा आढावा सदर विशेषांकातून घेतला आहे. सदर विशेषांक तयार करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले यांची मी ऋणी आहे.माझ्या आंतरवासिता गटातील छात्राध्यापकांच्या मेहनतीचे द्योतक म्हणजे हा विशेषांक आहे.या विशेषांकाकरिता प्रतिक आणि प्रज्ञा,भावनासह सर्व टीमचे मी मन:पूर्वक अभिनंदन करते! विशेषांकाची संपादिका म्हणून हा महत्त्वाचा दस्तऐवज आपल्या हाती देताना मला अत्यंत आनंद होत आहे. या सर्व कर्तुत्ववान स्त्रियांना आणि त्यांच्या दीपस्तंभासम महत्कार्यास हा अंक समर्पित करतो आहोत.या थोर कर्तृत्वाचा वसा आपण घेऊया.

**प्रा. बिजली दडपे**

**संपादक**

# अंतरंग


| अनुक्रमांक | कर्तृत्ववान महिलेचे नाव | छात्राध्यापकाचे नाव |
|---|---|---|
| 1. | डॉ. सुरेखा जाधव | प्रतिक स्मिता उत्तम पवार |
| 2. | सवितादेवी शहाजीराजे राजेभोसले | प्रज्ञा धनंजय साळुंखे |
| 3. | राहीबाई सोमा पोपेरे | भावना शिवराम भगत |
| 4. | कविता राउत | प्रेमा दिनेश पडवळे |
| 5. | गोदावरी श्यामराव परुळेकर | सूरज रविंद्र बुंधे |
| 6. | अनुताई बालकृष्ण वाघ | ज्योती अशोक डोंबरे |
| 7. | उर्मिला पवार | सुस्मिता शंकर रणपिसे |
| 8. | तारा भवाळकर | विपुल विलास धापशी |
| 9. | डॉ. राणी बंग | सुरज शंकर म्हस्कर |



## २१ व्या शतकातील 'साऊ '

माणूस म्हणजे काय? तर फक्त साडेतीन हातांचा नरदेह? की दीड इंच पोटाच्या मागे धावणारे दोन निश्चल पाय? कदाचित ही व्याख्या फक्त श्वास आणि भुकेवरती जगणाऱ्या काहींसाठी लागू असेलही. पण ज्यांचे आयुष्य कधीच या दोन गोष्टींभोवती फिरत नाही. ज्यांच्या आयुष्यात स्वतःत स्वजाणिवा आणि इतरांबाबत संवेदना असतात. ज्यांच्या जीवनाला तत्व, प्रामाणिकता आणि कारुण्याची झालर असते. तीच माणसं हा माणसाचा जन्म सार्थकी लावतात. आपल्या संपूर्ण आयुष्यातून इतरांसाठी जे जे काही करता येईल ते सर्व करायचे. आणि माणूस जगला पाहिजे याचसाठी जगायचे असा जगण्याचा विवेकी उद्देश घेऊन,शेकडो अनाथांची माय होत,समतेच्या वाटेवरून मार्गक्रमण करणारी आमच्या पिढीची आधुनिक ' साऊ' म्हणजेच डॉ.सुरेखा रवींद्र जाधव.

आपल्या डॉक्टरी पेशातून पुढे जात असताना अर्थप्राप्ती पलीकडचे आयुष्य म्हणजे नेमकं काय असतं ? याचं उत्तम उदाहरण जर पाहायचं असेल तर ते डॉ. सुरेखा जाधव मॅडम यांच्याकडे पाहून कळतं.

दिनांक 21 सप्टेंबर 1968 रोजी नागपूरच्या भूमीत जन्माला आलेल्या डॉक्टर सुरेखा. परिस्थितीशी लढत झगडत,संघर्षरत राहत मुंबई विद्यापीठातून त्यांनी बी.ए.एम. एस ही वैद्यकीय पदवी प्राप्त केली. आणि आपल्या एका नव्या व मानवतेच्या प्रवासाला सुरुवात केली.

आणि या प्रवासात त्यांना साथ लाभली ते अनाथांचे नाथ म्हणून ओळखले जाणारे डॉ. रवींद्र जाधव यांची. माझ्या आजूबाजूला असलेल्या अनेकांच्या डोक्यावर छप्पर नाही,उपचाराविना ज्यांना स्वतःचे प्राण गमवावे लागत आहेत. अनाथ म्हणून ज्यांना त्यांचे संपूर्ण आयुष्य रस्त्यावर काढावे लागते.किंवा वय झाले म्हणून ज्यांना स्वतःच्याच मुलांकडून हिणवलं जात आहे. अशी आणि याहून भयान मानवी परिस्थिती आजूबाजूला असताना, डॉक्टरी पेशाच्या खुर्चीत बसून निव्वळ नफा कमावणे म्हणजे आपण घेतलेल्या शिक्षणाचा आणि माणूस म्हणून घेतलेल्या जन्माचा हा अपमानच आहे. आणि म्हणून बुद्धाच्या कारुण्याची झोळी घेऊन, ज्योती सावित्रीच्या शिक्षणाने तेजोमय होऊन आणि बाबासाहेबांच्या विचारांनी प्रज्वलित होऊन मानवतेसाठी आपले आयुष्य बहाल करणाऱ्या डॉ. सुरेखा जाधव मॅडम. संवेदनशील मनाला कधीच स्वस्थ बसता येत नाही. जागृत डोक्याला कधीच हतबल होता येत नाही. आणि म्हणूनच याच संवेदनशील मनाने आणि जागृत मस्तकाने आज गोरगरिबांसाठी राबणारी ही डॉक्टर रूपातील ' माय '.

आज डॉक्टर मित्र चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून आणि डॉ सुरेखा आणि रविंद्र जाधव या दांपत्याच्या कारुण्य भावनेतून निराधार मुला मुलींचे निःशुल्क वस्तीगृह सुरू आहे. आज अनेक शाळकरी महाविद्यालयीन मुलं आपले ज्ञानार्जनाचे कार्य याद्वारे सुलभपणे करू शकत आहेत. एका ठराविक वयानंतर आरोग्य,खर्च,वेळ यांसारख्या असंख्य कारणांमुळे आपल्या पोटच्या मुलांना आपले जन्मदाते आई-वडील नकोसे होतात.बेघर होतात तेव्हा,डॉ.मित्र चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून त्यांना सांभाळण्याचे कार्य मॅडम त्यांच्या पतीच्या सोबतीने अविरतपणे करीत आहेत. आजारपणामुळे कोणाचाही जीव जाऊ नये. उपचाराविना कोणीही तडफडून मरू नये. आणि निव्वळ पैसा नाही म्हणून कोणास उपचार मिळत नसतील तर त्यांच्यासाठी "मोफत संविधान दवाखाना " चालविला जात आहे. बेघरपणे रस्त्यावर फिरणाऱ्या अनाथांचे पुनर्वसन केंद्र, अल्पदरात ॲम्बुलन्स सेवा आज मॅडमच्या कल्पनेतून गोरगरिबांसाठी पुरविल्या जात आहेत. इतकच नव्हे तर, परिस्थितीमुळे अशिक्षित राहिलेल्या परंतु आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्या स्त्रियांसाठी " रमाई मेणबत्ती उद्योग" "अन्नपूर्णा पोळी भाजी केंद्र" "महिला बचतगट खानावळ" "महिला पालेभाज्या विक्री केंद्र" यांसारख्या उपक्रमातून शेकडो महिलांच्या हाताला काम मिळत आहे. आणि हे सर्व करत असताना कोणत्याच पद्धतीचे शासकीय अनुदान न मिळता, आपल्या उदरनिर्वाहाच्या कमाईतून, आणि लोकांनी उभ्या केलेला चळवळीतून हे कार्य अविरतपणे सुरू आहे.

सुशिक्षितांनी कायम जागरूक राहिले पाहिजे. आणि इतरांना जागरूक केले पाहिजे. समाजात घडणाऱ्या विघातक गोष्टींविरोधात ठामपणे आवाज उठवून त्या विरोधात लढले पाहिजे. समता,समानता आणि.लोकशाहीची मूल्ये जनमाणसात बिंबविली पाहिजे. आणि या देशातील

प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार बहाल करणाऱ्या भारतीय संविधानाचे रक्षण करण्यासाठी आपण कायम कटिबद्ध असले पाहिजे. या भूमिकेतून "संविधान सैनिक संघ" या संस्थेच्या संस्थापक कार्याध्यक्ष म्हणून मॅडम आज राज्यस्तरावरती काम पाहत आहेत. लोकांमध्ये संविधानाबाबत जागृती व्हावी यासाठी त्या संविधान साक्षर मोहीमसुद्धा राबवत आहेत. त्याचबरोबर डॉ.मित्र मासिकाच्या सहसंपादक, लोकजागृती संस्थेच्या सचिव, डॉक्टर मित्र चॅरिटेबल ट्रस्टच्या खजिनदार यांसारख्या अनेक पदांवरती आज मॅडम जबाबदारीने आणि तत्परतेने काम करीत आहे.

निस्वार्थी हेतू, प्रामाणिकपणा, आणि मानवतेच्या या मार्गावर आज देशभरातून त्यांच्या कार्याचा गौरव केला जात आहे. दैनिक लोकमत द्वारा दिला जाणारा प्रतिष्ठेचा कल्याण डोंबिवली गौरव पुरस्कार 2022, वैभवी आदर्श महिला सन्मान पुरस्कार 1996, रमाई पुरस्कार 2022, आदर्श कल्याणकर पुरस्कार 2023, राजश्री शाहू महाराज पुरस्कार 2023, रोटरी जीवनगौरव सन्मान 2023, आदिवासी भूषण पुरस्कार 2022, जागर स्त्री शक्ती पुरस्कार 2022 यांसारखे असंख्य पुरस्कार त्यांच्या कामाची पोचपावती देतात.

या पुरस्काराने त्या कधीच भारावून गेल्या नाहीत. तर पुरस्कार म्हणजे आपली वाढलेले जबाबदारी आहे असं म्हणत, त्यांनी त्यांची मानवतेची ही वाट अधिक बळकट करण्यासाठी इतरांनी या चळवळीत सामील होण्याचे आवाहनसुद्धा केले आहे. डॉक्टर मित्र चॅरिटेबल ट्रस्ट आणि संविधान सैनिक संघ यांच्या कार्यामध्ये आपण एक माणूस म्हणून सर्वांनी एकत्र यावे अशी इच्छा डॉ. सुरेखा जाधव व्यक्त करतात.

आणि म्हणून 21 व्या शतकातल्या या या आधुनिक साऊला मानाचा मुजरा.

प्रतिक स्मिता उत्तम पवार

बी.एड.द्वितीय वर्ष

२०२३-२४

मुख्याध्यापक आंतरवासिता गट क्र.- ०१

सी.के.ठाकूर विद्यालय,नवीन पनवेल



## सविताराजे भोसले वहिनी म्हणजेच माणसासाठी माणुसकी जपणारी राजकारणातील खरी धाडसी महिला

काळ बदलत असला तरी अजुनही गावा-गावातील जुन्या रूढी व परंपरा हद्दपार झालेल्या नाहीत. खेड्यातील पाटील - देशमुख परिवारातील महिला उंबरठ्याबाहेर पडत नाहीत. राजघराण्यातील महिला तर बाहेर पडणे अशक्यच आहे. या सर्व परंपरेला छेद देवून जिंती येथील राज घराण्यातील सवितादेवी शहाजीराजे राजेभोसले या महिला घराबाहेर पडल्या राजेभोसले यांचे माहेर कर्जत (जि. नगर) असून त्या बाळासाहेब तोरडमल-पाटील यांच्या कन्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचे थोरले बंधू संभाजी महाराजांचे अठरावे वंशज असलेले जिंतीकर शहाजीराजे उमाजीराव राजेभोसले यांच्याबरोबर त्यांचा विवाह १९ डिसेंबर १९९२ ला झाला. लग्नानंतर त्या सुरवातीला राजघराण्याच्या रिवाजानुसार राहात होत्या. त्यांचे माहेर शेतकरी परिवारातील असल्यामुळे त्यांना शेतीचा चांगला अनुभव होता. सासरी शेकडो एकर शेती असून त्यातून पाहिजे तसे उत्पन्न येत नव्हते. ही बाब त्यांच्या लक्षात आली. त्यादृष्टीने त्यांनी त्यांचे पती शहाजीराजे राजेभोसले यांची शेतीत लक्ष घालण्याबाबत परवानगी घेतली. त्यानंतर त्यांनी शेतीकडे लक्ष दिले. पडीक शेतीची सुधारणा केली. सुरवातीला त्यांनी स्वत: ट्रॅक्टर चालवला, महिला व पुरूष मजुराच्या बरोबरीने उभे राहून त्यांनी शेतीत बांध घालणे, सपाटीकरण करणे, जमीन लागवडीयोग्य झाली की त्यात ऊस लावणे अशी कामे केली. त्या बरोबरच अधिक उत्पादनासाठी

योग्य त्या पिकाचे नियोजन करून व कायमस्वरूपी पाण्यासाठी उजनीवरून पाईपलाईन करून उसासारखी नगदी पिके घेतली आहेत. पूर्वी ज्या जमिनी फक्त नावालाच होत्या, त्यातून लाखो रूपयाचे उत्पन्न सुरू झाले. त्या परिसरातील लोक आवर्जून शेती पाहयाला येवू लागले. एवढेच नाहीतर एका महिलेने केलेली शेतीतील सुधारणा पाहून त्यांना जिल्हा परिषदेने सन २001 साली कृषीनिष्ठ महिला असा पुरस्कार दिला आहे. सन २००७ साली बारामती येथील शारदा प्रतिष्ठानचाही विशेष पुरस्कार मिळाला. यानंतर गावातील महिलांनी त्यांना गावच्या राजकारणात येण्याचा आग्रह धरला. पती जिल्हा परिषद सदस्य,संचालक अशा पदांवर काम करतानाही त्यांनी सवितादेवी राजेभोसले यांना राजकारणात येण्यास प्रवेश दिला. सन २००६-०७ च्या ग्रामपंचायत निवडणुकीत त्या सर्वसाधरण जागेवर उभ्या राहिल्या व निवडूनही आल्या. त्यानंतर बिनविरोध सरपंच झाल्या. पुढे ग्रामपंचायत निवडणूकीनंतरही मोठ्या मताने सरपंच झाल्या.

३० जानेवारी २०१२ रोजी झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीनंतर त्या तालुक्यात प्रसिध्दीच्या झोतात आल्या. तालुक्यातील महत्वाच्या आंदोलनात व निवडणुकामध्ये त्यांनी आवर्जुन सहभाग घेतला. त्यांनी दुष्काळ, पाणीटंचाई, माळढोक, उजनीचे पाणी, विजेचा प्रश्न आदी विषयावर लक्ष केंद्रीत केले. गावामध्ये त्यांनी विविध सुधारणा केल्या, पोलीस दूरक्षेत्रातील पोलिसांना गावातच राहण्याची सक्ती केली. पोलीस दूरक्षेत्रावर वायरलेस सेट बसवून घेतला, आरोग्य केंद्र मंजूर करून घेतले आहे. जनावरांचा दवाखाना बांधून घेतला आहे.

एक महिला काय करू शकते हे तालुका राजकारणात स्वत:चा वेगळा ठसा उमटवून प्रशासन व जनतेत आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. त्या स्वत: पदवीधर असून, अभ्यासू व उत्तम वक्तृत्व असलेल्या नेत्या आहेत.

करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातून गेली प्रत्यक्षपणे सत्ता असो किंवा नसो परंतु एक महिला आपल्या सर्वसामान्य जनतेच्या घरातील चुलीच्या त्रासातून ते तहसिल कागदापर्यंतच्या अडचणींना आपल्या एका उत्तम गुणांतून मार्ग शोधत आहे.

राजेभोसले हे पानिपतच्या युद्धानंतर शिंदेसोबत ग्वॉल्हेरला गेलेले होते.यामुळे मुळचे महाराष्ट्रीयन असलेले जिंतीकर असलेले राजेभोसले घराण्याचे शिक्षण मध्यप्रदेश राज्यात झालेले आहे.राजघराण्यातील सून म्हणून वरिष्ठ राजघराण्यात प्रसिध्द आहेत

गेल्या २०१४ च्या करमाळा -माढा विधानसभा निवडणुकीत शिवसेना उमेदवार नारायण पाटील यांना पाठींबा दिला व पाटील आमदार झाले.पुढे २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणूकीत २८०८ विक्रमी मतांनी विजयी होऊन तालुक्याच्या पश्चिम भागातील जनतेला आपले काम काय हे दाखवून दिले

त्यामध्ये पश्चिम भागातील सर्व रस्ते मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आमदार नारायण पाटील यांच्या म्हणण्यानुसार सविताराजे भोसले यांचा सिंहाचा वाटा आहे.जिंती प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी गेल्या १० वर्षांपासून प्रयत्न करत होत्या.अखेर ५ कोटी ६० लाख ४७ हजार एवढ्या मोठ्या निधीच्या इमारत व निवासस्थान बांधकामाचा भूमिपूजन सोहळा खासदार विजयसिंहजी मोहिते-पाटील व आमदार नारायण पाटील यांना एकत्र करून तालुक्याची राजकीय दिशा विकासात्मक मुद्यावर बदल सविताराजे भोसले यांनी करून दाखवला.तसेच ३० गुंठे जमिन आरोग्य केंद्रासाठी बक्षिसपत्र करून देण्याचे सर्वांत मोठं काम राजेभोसले परिवाराने केलेले आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत पोलिस स्टेशन पाठपुराव्यात आहे ते काम मी १०० %करून दाखवणारच हा विश्वास त्या बाळगून आहेत. २०२० साली जिल्हा परिषदेचे सभापती पद बाजूला सारून तालुक्याच्या विकासासाठी अध्यक्षासाठी एक पाऊल मागे घेतले.असा राजकारणातील मोठेपणा सविताराजे भोसले यांचे रूपाने पाहत असून अनेक छोटी- मोठी कामे वहिनीच्या प्रयत्नातून होत आहेत.शेतकरी वीज प्रश्नांवर अतिशय परखड सत्य परिस्थिती मांडण्याचे धाडस करून पश्चिम भागातील बर्याच शेतकरी ट्रान्सफार्म वीज जोडणीतून चालू करण्यात सविताराजे भोसले वहिनींना यश आलेले आहे.पीक जळतंय म्हणून तळमळ काय असते ही जाणणारी शेतकर्यांची माऊली धाडसाने लढत आहे.

सकाळी ६ ची वेळ आणि वहिनींचा फोन चालू झाला. दिवसभरात जेवन करायला तर वेळच नाही. तहसील,पोलीस स्टेशन, दवाखाने,शैक्षणिक, शेती ,कित्येक वाद-विवादात्मक भांडणाचे तीन-तेरा,न होणाय्रा गोष्टीचा शेवट करत वहिनींकडे येणाय्रा लोकांना माणसातील माणुसकीचा खरा जन्म दाखवून कधी आईच्या रूपाची माया तर कधी शब्दांचा खरा मारा देऊन प्रत्येक गोष्टीचा चांगल्या मार्गाने शेवट करणं म्हणजे वहिनींचा शब्द होय.

आठरापगड जाती व्यवस्था असलेल्या जिंती गावचा गावगाडा चालवणे व पश्चिमभागातील जनतेला प्रत्यक्ष जाणून घेणे हे तालुक्यात एक उत्तम उदाहरण म्हणून वहिनीसाहेब एक आदर्श आहे. राजेभोसले वहिनी, आपल्या गृहिनी या स्वयंपाक घरातून असताना त्यांच्या चहाचा आस्वाद आणि जेवणाचा आग्रह हा तर रोजचा दिनक्रम आहे असंच वाटतं. प्रत्येक व्यक्ती हा त्यांच्या स्वयंपाक घरापर्यंत जाऊ शकतो कारण राजेभोसले हे कुटूंब अगणित असंख्येचं तर माहेरघर आहे. आमच्या घरात येणारा प्रत्येक व्यक्ती आमचा आहे आणि तो आमच्या परिवाराचा सदस्य आहे.हे प्रत्येकजन अनुभवतोय.

प्रशासन व राजकारण या दोन गोष्टी सांभाळत असताना माणसाला किती तत्पर राहावे लागते. यासाठी वहिनीसाहेब एक महिला काय करू शकते हे बोलणं फक्त विरोध म्हणणाय्रा

विरोधकाला समजते.त्यांचा संकल्प पश्चिम भाग सुविधायुक्त यासाठी वहिनीनी एक सुत्र सातत्यातून भविष्य प्रगत शेेती-विकासप्रिय राजकारण- भविष्य पश्चिम भाग ते तालुका बदल हि भूमिका उराशी बाळगुन एक महिला आदर्श उदाहरण महाराष्ट्रातील महिलांसाठी प्रेरणादायी आहे.


प्रज्ञा धनंजय साळुंखे

बी.एड.द्वितीय वर्ष

२०२३-२४

उपमुख्याध्यापक आंतरवासिता गट क्र.- ०१

सी.के.ठाकूर विद्यालय,नवीन पनवेल



**“बीजमाता”**

राहीबाई सोमा पोपेरे (जन्म : इ.स. १९६४) या महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील अकोला तालुक्यातील कोंभाळणे या गावातील महिला शेतकरी आणि पारंपरिक बियाणांच्या वाणांच्या संरक्षक-संवर्धक आहेत.

राहीबाईसह घरात एकूण आठ भावंडे होती व राहीबाई हे त्यांच्या आईचे पाचवे अपत्य होत्या. अल्पवयात त्यांच्या आईचा मृत्यू झाला. राहीबाईंचे वडील शेतकरी होते व त्यांची चार-पाच एकर कोरडवाहू शेती होती. सासरदेखील शेतकरी कुटुंबातील होते. तेथेही कोरडवाहू शेती होती.

अधिक उत्पादनासाठी शेतीमध्ये हायब्रीड बियाणे वापरात होते पण त्यांचा नातू आजारी पडू लागला, तेव्हा मूळ कारणाचा शोध घेतला आणि लक्षात आले की सेंद्रिय बियाणे वापरली तर आरोग्य उत्तम राहते. आणि म्हणून तसा प्रयोग करून पाहिला. तो यशस्वी झाल्यावर कार्याला सुरुवात झाली. बचत गटाच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून देण्यास सुरुवात केली. त्यात बाइफ संस्थेचेही साहाय्य लाभले. त्यांनी देशी बियाणाची बँक सुरू केली. रानभाज्यांच्या बियासुद्धा या बँकेमार्फत पुरविल्या जातात

राहीबाई मूळच्या याच गावच्या. राईबाईंच्या 'देशी बियाण्यांच्या बँकेत' आज ५२ पिकांचे ११४ वाण आहेत. ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकरांनी एका कार्यक्रमात त्यांचा 'सीड मदर' म्हणजेच बीजमाता असा उल्लेख केला. बीबीसीने शंभर प्रभावशाली महिलांत त्यांचा समावेश केला आहे.

राहीबाई यांच्याकडे अनेक प्रकारच्या जुन्या गावठी पालेभाज्या व वेलवर्गीय भाज्यांचे बियाणे जतन केलेले आहे. हे कोणत्याही आंतरराष्ट्रीय सीड कंपनीकडे उपलब्ध नाही. राहीबाईकडे जे बियाणे आहे ते शेकडो वर्षे आपले पूर्वज खात होते ते मुळ स्वरूपात आहे. त्यांच्याकडे फक्त वालाचेच वीस प्रकार उपलब्ध आहेत. त्यांनी तीन हजार स्त्रीया व शेतकरी यांचा बचतगट बनवलाय. त्यांच्या मार्फत या भाज्या अस्सल गावठी व संपूर्ण सेंद्रिय पद्धतीने पिकवल्या जातात व त्यांचे बियाणे मडक्यात जतन केले जाते. हे पारंपारिक चविष्ट व नैसर्गिक बियाणे मुळ नैसर्गिक स्वरूपात जगात कोणत्याही कंपनीकडे नाही.

राहीबाईंनी कळसूबाई शिखर परिसरातील जैवविविधता जपण्यासाठी 'कळसूबाई परिसर बियाणे संवर्धन समिती'ची स्थापना केली. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या काही बियाणांचे जतन व संवर्धन त्यांनी केले आहे. त्यांच्या प्रेरणेमुळे आज नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे चारशे एकर जमिनीवर गावरान वाणाची शेती केली जाते.

दि. ०८ मार्च २०१८ रोजी, भारत सरकारच्या महिला आणि बालकल्याण विभागातर्फे 'नारीशक्ती पुरस्कार' देण्यात आला. देशी वाणांच्या बियाण्यांची जपणूक केल्याबद्दल राहीबाई यांना भारत सरकारने इ.स. २०२० साली पद्मश्री पुरस्कार पुरस्कार दिला . इ.स. २०२०चा हा पुरस्कार दिनांक ८ नोव्हेंबर २०२१ रोजी भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते त्यांना प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागातर्फे आत्मा प्रकल्पांतर्गत आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे.

भावना शिवराम भगत

बी.एड.द्‌वितीय वर्ष छात्राध्यापक





## ‘सावरपाडा एक्स्प्रेस’

दुर्गम भागातील रस्ते म्हणजे मातीचाधुराळा .पाण्यासाठी वणवण करणे हा रोजचा दिवस .अशा प्रतिकूल परिस्थितीत कुरकुर न करता हार न मानता जीवन जगणे म्हणजे एक दिव्यच!असा खेड्यापाड्यांमध्ये गुणवत्ता असते पण ती शोधावी लागते.

असाच एक डोंगरदऱ्यांनी वेढलेला आदिवासी पाडा .पाण्याच्या शोधासाठी मैलोन मैल भटकंती करावी लागे. त्याच आदिवासी पाड्यावर अनवाणी पायांनी चालणारी लाकूडफाटा गोळा करणारी एक मुलगी. तिने राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा दबदबा निर्माण केला आणि ऑलिंपिक स्तरावर झेप घेतली. या आंतरराष्ट्रीय धावपटूचे नाव आहे कविता राऊत आणि त्या पाड्याचे नाव आहे, सावरपाडा. हा पाडा नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यात आहे तिचे बालपण निसर्गाच्या सानिध्यात गेले तिची आजवरची वाटचाल एक दीर्घ साधना बनली आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत कांस्य आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य पदके कविताने पटकावली. लागोपाठच्या या दोन्ही स्पर्धांमध्ये भारताचे नाव उंच करणारी धावपटू म्हणजे सावरपाडा एक्सप्रेस कविता राऊत. चीनमधील गुआगजऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत दहा हजार मीटर धावण्यात कविताचे सुवर्णपदक अवघ्या सेकंदांनी हुकले, पण त्या प्रसंगी कविताची समजूत तिच्या आईने काढली. आईच्या शब्दांनी कविताला दिलासा मिळाला.

अवघ्या चौथी शिकलेल्या आईच्या समंजस शब्दाने कविताला आजवर अनेक कठीण प्रसंगी आधार दिला आहे.कष्टप्रद अनुभवामुळे कविताचे पाय कणखर बनले. नासिक जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत कविताने धावण्यात प्रथम क्रमांक मिळवला. पण कविता चे वेगळेपण तिचे वडील रामदास आणि आई सुमित्रा यांना फारशा त्रीवेतने त्यावेळी जाणवले नाही. कविताच्या पायांमधील चमकदार दौड हेरली ती प्रशिक्षक विजेंद्र सिंग यांनी. त्यांनी कविताच्या आई-वडिलांची मानसिकता तयार केली आणि तिला नाशिकच्या भोसला मिलिटरी स्कूलच्या मैदानावर तंत्रशुद्ध पद्धतीने धावण्याचे धडे देणे सुरुवात केली. बूट घालून धावणे कविताला अवघड वाटायचे, कारण लहानपणा पासून अनवाणी धावण्याची तिला सवय होती. विजेंद्र सिंग यांनी तिच्याकडून बुट घालून धावण्याचा सराव नियमितपणे करून घेतला.

हिऱ्याला पैलू पाडल्यावर त्याचे तेच अधिकच फैलावते, तसे तिच्याबाबतीत झाले. गुजरात मधील गांधीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील शालेय स्पर्धेत धावण्यात रौप्य पदक मिळवून देणे यशाचा आरंभ केला. पुढे मग नाशिक येथे सराव आणि हरसुल येथे शिक्षण अशी कसरत कविता करत होती. कविताची ही ओढाताण पाहून विजेंद्रसिंग यांनी तिला अकरावीसाठी भोसला मिलिटरी कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला. ती राहणार कुठे? हा कविताच्या आई वडिलांना पडलेला प्रश्नही विजेंद्र सिंग यांनी सोडवला. 24 ऑक्टोबर 2002 पासून पुढील पाच वर्ष ती त्यांच्याच घरी राहिली. स्वतःचा एक मुलगा आणि एक मुलगी असलेल्या सिंग दाम्पत्याने आपली दुसरी मुलगी म्हणून कविताचा सांभाळ केला. तिच्या धावन्याचा गतीकडे विजेंद्र सिंग यांनी लक्ष पुरवले आणि त्याची प्रचिती म्हणजेच कविताची यश. एकापाठोपाठ एक विक्रम तिच्या नावावर झळकू लागले. कविताच्या यशामुळे हरसुल सावरपाडा या भागाला नवी ओळख मिळाली. आज केवळ राऊत कुटुंबालाच कविताचा अभिमान वाटतो असे नाही तर संपूर्ण हरसुल परिसराची हीच भावना आहे.

नवी दिल्लीतील राष्ट्रकुल स्पर्धेत कविता जिंकल्याचे जाहीर होताच हरसुल सावरपाडा येथे जणू काही दिवाळीत साजरी झाली होती. स्पर्धेत विजयी झाल्यानंतर कविता आपल्या गावी येणार, म्हणून सकाळपासून जो तो स्वागताच्या कामात गुंतला होता. कविताचे कौतुक करण्यासाठी गावोगावचे लोक हजारोंच्या संख्येने उपस्थित झाले होते. लेखी भाऊ ते निर्माण झालेले वलय, तिला सत्कारासाठी घेऊन जाण्यास येणाऱ्या आलिशान गाड्या ,पत्रकारांचा गराडा यामुळे आपली लेक लय मोठी झाली याचे समाधान तिच्या आईच्या डोळ्यांमध्ये सहज वाचता येत होते.

आज कविता भारतातील अव्व्यल  धावपटू आहे पी .टी उ.षा या धावपटूला ती आपला आदर्श मानते ती खूप मेहनती आहे धावण्याचा सराव ती मनापासून करते आपल्या प्रशिक्षकांनी दिलेले छोटे मोठे सूचनांचे कटाक्षाने पालन करते .कविताचे म्हणणे आहे मेहनत करणे आपल्या हातात असते  मेहनत हाच उद्दिष्टाकडे ध्येयाकडे नेणारा महामार्ग आहे. हा महामार्ग आपल्याला यशाकडे नेतो आपले जीवन आपणच घडवतो.

प्रेमा दिनेश पडवळे

बी.एड.द्वितीय वर्ष छात्राध्यापक



## लेखिका, समाजसेविका कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर

जन्म पुणे येथे 14 ऑगस्ट 1908 रोजी झाला. (मृत्यू 8 ऑक्टोबर 1996) त्या भारतीय स्वातंत्र्यसैनिक, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या व मराठी लेखिका होत्या. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण फर्गसन महाविद्यालयात झाले.त्यांनी बी.ए., एलएल. बी. पर्यंत शिक्षण घेतले होते. वर्ष 1932 मध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच त्यांनी ब्रिटिशांविरुद्धच्या विद्यार्थी चळवळीत भाग घेतला व तुरुंगवास पत्करला. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या कामगार चळवळीकडे आकर्षित झाल्या. सामाजिक कार्यासाठी त्या मुंबईमध्ये आल्या.

वर्ष 1930 मध्ये त्या गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्थापन केलेल्या "भारत सेवक संघा'च्या आजीव सदस्य झाल्या. त्यांची साम्यवादी कार्यकर्ते शामराव परुळेकर यांच्याशी ओळख झाली. शामराव आणि गोदूताई 24 मे 1939 रोजी विवाहबद्ध झाले. काही मतभेदामुळे भारत सेवक संघ या संस्थेपासून परुळेकर दांपत्य बाजूला झाले.

कामगार नेते ना. म. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या बॉम्बे सोशल सर्व्हिस लीग या संस्थेत त्यांनी कामगारांच्या शिक्षणप्रसारासाठी प्रबोधन केले व वाचन संस्कृती वाढविण्यासाठी गिरगावपासून परळपर्यंतच्या औद्योगिक क्षेत्रात ठिकठिकाणी वृत्तपत्रे वाचण्यासाठी केंद्रे सुरू केली. त्यामुळे लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली.

चिंचपोकळी येथे वाचनालय सुरू केले तसेच 11 मोफत ग्रंथालये व 10 मोफत वाचनालये चालू केली होती. भारतात ब्रिटिश आले. औद्योगिक क्रांतीचा परिणामही भारतातील

परिस्थितीवर होणे क्रमप्राप्त होते. बलुतेदारीवर आधारलेली जीवनशैलीला औद्योगिक क्रांतीने धक्का दिला. या गोष्टी अपरिहार्य होत्या. मुळातच शिक्षणाचा अभाव व निर्धनता आदिवासी लोकांचे हाल अगोदरपासून होतच होते. वारली आदिवासींना तर वालीच नव्हता.गोदावरी यांनी वारली समाजातील स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडली. जमीनदार आणि पितृसत्ताक सामाजिक व्यवस्थेचा दबाव यामुळे महिलांची घुसमट होत होती.वेठबिगारीतून जमीनमालक त्यांच्यावर अत्याचार करीत असत. तसेच वारली महिला या पुरुषाइतक्या पवित्र नाहीत, असा गैरसमज रूढ होता.अशिक्षितपणा आणि अंधश्रद्धांचा पगडाही समाजावर असल्याने प्रबोधन करणे खूपच जिकिरीचे होते. स्त्रियांवरील या अत्याचाराविरुद्ध लढण्याचा निर्णय त्यांनी घेतला, परंतु स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी आदिवासींना शिक्षण देणे गरजेचे होते. तेव्हा त्यांच्या शिक्षणासाठीच काम करण्याचे त्यांनी ठरविले. त्याबरोबर सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी त्यांना बळही गोदावरी यांच्यामुळे मिळाले.या साऱ्या संदर्भातील लढ्याच्या आठवणी त्यांनी

आपल्या "जेव्हा माणूस जागा होतो" या

आत्मचरित्रात सांगितल्या आहेत. या पुस्तकाला 1972 साली साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. या पुस्तकातून प्रेरणा घेऊन अनेक कार्यकर्ते तयार झाले. दरम्यान त्यांचे पती शामराव यांचे आकस्मित निधन झाले.

पतीनिधनानंतर खचून न जाता त्यांनी त्यांचे कार्य चालूच ठेवले.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांची संघटित चळवळ नवले बुवांच्या अध्यक्षतेखाली कम्युनिस्ट पक्षाच्या किसानसभेच्या माध्यमातून सुरू झाली. यावेळी शामराव परुळेकर सरचिटणीस व गोदूताई परुळेकर यांची सहचिटणीसपदी निवड झाली. त्यानंतर परुळेकर दांपत्याने वेठबिगारी व लग्नगडी पद्धत नष्ट करण्याची हाक दिली.

सूरज रविंद्र बुंधे

बी.एड, द्‌वितीय वर्ष छात्राध्यापक




## अनुताई बालकृष्ण वाघ

अनुताई बालकृष्ण वाघ (जन्म मोरगाव पुणे 16 मार्च 1910 मृत्यू 26 सप्टेंबर 1992 )कोसबाड या आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या समाजसेविका व शिक्षणतज्ञ होत्या. त्यांनी शिक्षणाद्वारे आदिवासींच्या जीवनात जागृती निर्माण करण्याचे काम केले पालघर जिल्ह्यातील कोसबाडी येथे ताराबाई मोडक यांचे सोबत त्यांनी बालशिक्षणाचे कार्य केले.

अनुताईचे वडील बालकृष्ण वाघ हे सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीस होते वयाचे तेराव्या वर्षी इ. स. 1923 साली शंकर वामन जातेगावकर यांच्या शी अनुताईचा विवाह झाला परंतु सहा महिन्यातच त्यांना वयाच्या तेराव्या वर्षी वैधव्य आले असे असून सुद्धा तात्कालीन सामाजिक रूढीचे बंधन झुगारून त्यांनी शिक्षण घेतले व शिक्षिका म्हणून काम करीत असताना त्यांना ताराबाई मोडक भेटल्या आणि त्यांनी ताराबाईच्या बोर्डी ठाणे येथील आदिवासींसाठी असलेल्या ग्राम बाल शिक्षण केंद्रात प्रवेश केला व तिथेही इ.स.1947 ते 1992 अशी 47 वर्ष त्यांनी निरपेक्ष वृत्तीने ग्राम शिक्षणाचे कार्य चालवले पुढे कोसबाच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकारिणी सदस्य अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले त्याचे शिक्षण विषयक ग्रंथ इंग्रजी हिंदी गुजरातीतून अनुवादीत झाले प्रबोधन साठी वाहिलेले शिक्षण पत्रिका व स्त्रीजागृतीसाठी असलेल्या सावित्री

मासिकेच्या त्या संपादिका होत्या कोसबाच्या टेकरीवर आदिवासीचे उन्नतीसाठी एक संस्था स्थापन केली या संस्थेलाच कोसबाड प्रकल्प म्हणून ओळखले जाते आदिवासींचे शिक्षणासाठी पाळणाघरे बालवाड्या प्राथमिक शाळा प्रौढ शिक्षण वर्ग बालसेविका ट्रेनिंग कॉलेज इत्यादी शैक्षणिक संस्था सुरू केल्या इ.स.1981 साली राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले होते. आदिवासीच्या शिक्षणासाठी संस्था स्थापन करून आयुष्य वेचणाऱ्या या अनुताईंना आदर्श शिक्षिका दलित मित्र आदर्श माता फाय फाउंडेशन सावित्रीबाई फुले बाल कल्याण राष्ट्रीय पुरस्कार  जमनालाल बजाज पुरस्कार अशा अनेक पुरस्कारबरोबरच पद्मश्री  सन्मानित करण्यात केले गेले.

1933 -1944 या काळात बोर्डी येथील ग्राम बालशिक्षा केंद्र व 1945 -1973 या काळात कोसबाड येथील नूतन बालशिक्षा केंद्रात अनुताईंना अध्यापिका म्हणून काम केले त्यानंतर 1974-75 मध्ये कोसबाडच्या नूतन बालशिक्षा केंद्राच्या सरचिटणीस 1976 -1979 या काळात राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकारिणीच्या सदस्य अखिल भारतीय पूर्व माध्यमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा इत्यादी पदांचा कारभार त्यांनी सांभाळला  अनुताईंचा अनेक शिक्षण संस्थाशी कनिष्ठ सबंध आला तथापि बोर्डी  कोसबाडच्या आदिवासी परिसरामध्ये त्यांनी दहा पाळणाघरे अकरा बालवाड्या चार पूर्व प्राथमिक शाळा बालसेविका प्रशिक्षण वर्ग अंगणवाडी प्रशिक्षण वर्ग अध्यापक प्रशिक्षण विद्यालय कार्यानुभव प्रकल्प उद्योग प्रशिक्षण संस्था कुरण शाळा मूकबधिर संस्था डहाणू आरोग्य केंद्र अशी अनेक संस्था स्थापन केल्या .

या परिसरातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून त्यांनी मुलांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला ताराबाई मोडक यांनी ब्रिटिशांनी रुढ केलेल्या परकीय शैक्षणिक संकल्पनेला आव्हान दिले  होते. त्यांच्या प्रयोगशीलतेला अनुताईंच्या निर्मिती क्षमतेची तेवढीच प्रभावी जोड मिळाली आणि तिथून बोर्डी व नंतर कोसबाड ह्या बालशिक्षणाच्या प्रयोग शाळाच बनल्या. ताराबाईच्या मृत्यूनंतर या संस्थेची पूर्ण धुरा अनुताईंनी अखेर पर्यंत सांभाळली तसेच त्यांच्या विस्तारही केला .मुलांचे शिक्षण म्हणजे त्यांचे खेळणे शिकलो हे लक्षातही येऊ न देता मुलांना शिक्षित करावयाचे खेळण्याच्या बालगीतांच्या गोष्टींच्या रूपात शैक्षणिक साधने तयार करावयाची  त्यासाठी मुलांच्या भाव विश्वाचा शोध घ्यावयाचा .

ज्योती अशोक डोंबरे

बी.एड, द्वितीय वर्ष छात्राध्यापक



## ऊर्मिला पवार

माँ सावित्रीच्या लेकी म्हणजे आजच्या ऊर्मिला पवार . यांचा जन्म ७ मे १९४५रोजी झाला.या एक मराठी लेखिका आहेत. त्यांचे मूळ गाव तळकोकणात आहे. पवार यांचे वडील शिक्षक होते. पण लहानपणीच ते वारल्यामुळे आईला आयदान करीत चरितार्थ चालवावा लागला. त्यांचे एम.ए.चे शिक्षण झाल्यावर त्यांनी लिहायला सुरुवात केली. 'सहावं बोट' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९८८मध्ये प्रकाशित झाला. दलितांचा इतिहास व सद्यस्थितीचा अभ्यास तसेच बौद्ध धम्मग्रंथांचा मराठी अनुवाद, अशा प्रकारचे लेखनही ऊर्मिला पवार करतात.एकांकिका, समीक्षा असे लेखनप्रकार हाताळणाऱ्या ऊर्मिला पवार यांच्या ' आयदान ' या आत्मकथनाने मराठी साहित्यातील आत्मकथेला ऐतिहासिक वळण मिळाले. आज दलित आत्मकथनांच्या प्रवासाची चर्चा 'बलुतं ते आयदान' अशीच केली जाते. ऊर्मिला पवार यांच्या कथा, आत्मकथनाची इंग्रजी, स्वीडिश या भाषांमध्येही भाषांतरे झाली आहेत.

महाराष्ट्र राज्यातील कोकण ह्या प्रांतात पवार यांचा जन्म झाला. त्यांच्या महार समाजातील लोक परंपरेने बांबूच्या कामट्यांची सुपे, रोवळ्या, टोपल्या विणण्याचे काम (आयदानाचे काम) करीत होते.

उर्मिला पवार म्हणतात त्यानुसार २००० साली त्यांनी 'अबब! हत्ती 'नावाच्या छोट्यांच्या दिवाळी अंकात एक भाग लिहिला होता. तो छापून आल्यावर बाईंना आणखीन लिहावसे वाटले. 'चौथी भिंत' या पुस्तकात १९८९ साली त्यांनी लिहिलेली 'गोष्ट शैशवाची' ही गोष्ट छापून आली. त्यानंतर त्या अधिकाधिक लिहू लागल्या.

उर्मिला पवारांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते. लग्नानंतर त्या जिद्दीने पुढे शिकल्या. त्यांनी आंबेडकरी चळवळीत भाग घेतला, संघटना बांधल्या. त्यांनी मराठी वाङ्मय ह्या विषयात पदव्युत्तर पदविका मिळवली.

ऊर्मिला पवार पुढे महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीला लागल्या.

ऊर्मिला पवार ११-१२ वर्षे वयाच्या असताना १९५७ साली त्यांचे कुटुंब बौद्ध झाले.

ऊर्मिला पवार यांच्या ‘आयदान’ या आत्मकथनात्मक पुस्तकाचे सुषमा देशपांडे यांनी नाट्यरूपांतर केले आहे. या नाटकाचे ५०हून अधिक प्रयोग झाले आहेत.

डॉ आंबेडकर जीवन कालपट, आम्हीही इतिहास घडवला: आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचे योगदान, आयदान, उदान, कोकणातील दलितांचे रीतिरिवाज आणि लोकगीतं , दलित लेखिका आणि त्यांचे साहित्य, मॉरिशस एक प्रवास, सहावे बोट, हातचा एक असे अनेक पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.

धुळे येथे झालेल्या ११व्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. हे संमेलन १३ व १४ जानेवारी २०१३ या दोन दिवसांत भरले होते. जुलै २००४मध्ये मिळालेला ’प्रियदर्शनी अकादमी’चा २५००० रुपयांचा पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. नाशिकच्या समाज प्रबोधन संस्थेच्या वतीने रविवार दि. २४ फेब्रुवारी २०१३ रोजी सटाणा येथे कवी कैलास पगारे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेत ऊर्मिला पवार यांना समाज प्रबोधन संस्थेचा राज्यस्तरीय 'प्रबोधनमित्र' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सुस्मिता शंकर रणपिसे

बी.एड, द्वितीय वर्ष छात्राध्यापक



## डॉ. तारा भवाळकर

डॉ. तारा भवाळकर (जन्म : १ एप्रिल. १९३९) वैचारिक लेखन करणाऱ्या एक मराठी लेखिका

तारा भवाळकर या लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोककला या विषयांशी संबंधित असून या विषयांच्या त्या गाढ्या अभ्यासक आहेत. त्यांनी लोकसंस्कृती, नाट्यसंशोधन, संतसाहित्य, एकांकिका, ललित लेखन, लोककला यांविषयी तसेच स्त्री जाणिवांवर लक्ष केंद्रित करणारे विपुल प्रमाणात लेखन केले आहे आणि लोककला व लोकसाहित्य या विषयांशी संबंधित अनेक चर्चा, परिसंवाद, संमेलने यांत भाग घेतला आहे.

तारा भवाळकरांनी पौराणिक नाटक, लोकनाट्य, दशावतार, तंजावरची नाटके, यक्षगान, कथकली अशा नाट्य प्रकारांची जडणघडण शोधली. त्यांचे समग्र लेखन वस्तुनिष्ठ, यथार्थ व चिकित्सक दृष्टी आणि सैद्धांतिक अभ्यासाचा वस्तुपाठच आहे. मराठी विश्वकोश, मराठी वाङ्मयकोश आणि मराठी ग्रंथकोश या महत्त्वाच्या कार्यातही त्यांनी बहुमोल योगदान दिले आहे.

त्यांनी हरिवंशराय बच्चन यांच्या मधुशालाचे मराठीतले पहिले मराठी भाषांतर केले आहे. इंडिया बुक हाऊसने ते प्रकाशित केले होते. हे भाषांतर केले तेव्हा भवाळकर कॉलेजात शिकत होत्या. भवाळकरांनी विद्यार्थीदशेतच नाट्य एकांकिका स्पर्धांसाठी लेखन, दिग्दर्शन, व अभिनय केला. शिक्षण संपल्यावर त्यांनी स्वतःची ए.डी.ए. ही नाटक संस्था सुरू केली. त्या संस्थेच्या माध्यमातून शाळा,

कॉलेजच्या मुलांची नाटके बसवून दिली आणि त्यांना राज्य नाट्य एकांकिका स्पर्धेसाठी तयारी करून दिली.

मराठी भाषेतील कोश निर्मितीसाठी सहभाग : मराठी वाङ्मयय कोशासाठी ९ लेख,

मराठी ग्रंथ कोशासाठी ७ लेख,

मराठी विश्वकोशासाठी ४ लेख,

विश्वकोशातील लोकसाहित्य विभागाच्या अतिथी संपादक.

विपुल विलास धापशी

बी.एड, द्‌वितीय वर्ष छात्राध्यापक



## डॉ. राणी बंग समाजसेविका

एम.बी.बी.एस. उत्तीर्ण केल्यानंतर त्यांचे पती प्रख्यात समाजसेवक डॉ. अभय बंग यांच्याशी विवाहबद्ध होऊन समाजकार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. त्यांनी स्त्रीरोगशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. अमेरिकेच्या जॉन हॉपकिन्स विद्यापिठातून 'मास्टर्स इन पब्लिक हेल्थ' या विषयावरची पदवी त्यांनी १९८४ साली मिळवली.

त्यांनी, आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याविषयक समस्या व त्यांच्या भावविश्वाचा वेध घेणारी "कानोसा" व "गोईण" ही दोन पुस्तके लिहिली आहेत. त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कारासह "महाराष्ट्रभूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

'गोईण' म्हणजे मैत्रीण. गडचिरोली जिल्ह्यात आदिवासींशी गप्पागोष्टी करतांना जंगलातील झाडे, त्यांचे विविध उपयोग - खाद्यपदार्थ, औषधी, सरपण, कुंपण वगैरेंबाबतची उपयुक्त व मनोरंजक माहिती मिळत गेली, तिनी ही संकलित केलेली आहे.

भारतीय समाजात स्त्री-पुरुष संबंध, म्हणजे जीवन-प्रजनन या अतिशय नाजूक, संवेदनक्षम व गुप्त गोष्टी मानण्यात येतात. परंतु डॉ.राणी बंग यांनी केलेल्या या अध्ययनामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील दोन खेड्यांमधील स्त्रिया, त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील अनेक खाजगी, गुप्त गोष्टी अगदी मनमोकळेपणाने त्यांचेजवळ बोलल्या आहेत.

डॉ. अभय बंग आणि राणी बंग यांना आजवर अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले, त्यांतले काही

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाकडून डी.लिट. ही सन्माननीय पदवी

२००३ सालचा महाराष्ट्र सरकारचा महाराष्ट्रभूषण पुरस्कार

२०१८ सालचा पद्मश्री पुरस्कार

खरेखुरे आयडॉल्स (लेखसंग्रह), युनिक फीचर्स, २००६, संपादक सुहास कुलकर्णी, 'डॉ. अभय - डॉ. राणी बंग', लेखक श्रुती पानसे,.....

सुरज शंकर म्हसकर

बी. एड. द्वितीय वर्ष

२०२३-२४